# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ / चैत्र २, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(३)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **कृषि मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २९**

---

### शासकीय कब्जे हक्काच्या जमिनी रुपांतरण योजनेस मुदतवाढ मिळण्याबाबत

**(१) * १७५८१ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कब्जे हक्काच्या जमिनीच्या रुपांतरणासाठी प्रिमियम योजना सन २०१९-२०२२ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी तत्कालीन शासनाने जाहिर करण्यात येऊन जमिनीच्या वेगवेगळया संवर्गासाठी १०.१५ व २५ टक्के प्रिमियम आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची मुदत दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी संपुष्टात आली असून राज्यात कब्जे हक्काच्या २० हजारांहून अधिक जमिनी निवासी सोसायट्यांना देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईमध्ये तीन हजार सोसायट्या कब्जे हक्काच्या जमिनीवर असून सदरहू योजनेच्या कालावधीत मुंबई शहरात ५० हून कमी जमिनींचे हस्तांतरण झाल्याचे तसेच इतर इमारतींमधील सदनिकाधारकांच्या हस्तांतरण शुल्कासंदर्भातील अनेक जाचक अटींमुळे या सोसायट्यांचे हस्तांतरण प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेला दोन वर्षांची मुदतवाढ द्यावी असा प्रस्ताव तत्कालीन शासनाने दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय कब्जे हक्काच्या जमिनीच्या रुपांतरणासाठी प्रिमियम योजनेस मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावाबाबत तसेच प्रिमियमची रक्कम ५ टक्के करण्याचा निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) शासनाने कब्जे हक्काने भोगवटादार वर्ग-२ च्या धारणाधिकारावर अथवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या धारणाधिकाराचे वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याकरिता दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी नियम केलेले आहेत. या नियमानुसार संबंधित जमिनीचे प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रातील दरानुसार येणाऱ्या मूल्यांकनाच्या प्रयोजननिहाय ६०% ते ७५% अधिमूल्य आकारुन वर्ग-१ मध्ये रुपांतरणाची तरतूद आहे. तथापि, अशा अधिमूल्याच्या दराने ३ वर्षाच्या कालावधीकरिता म्हणजेच दिनांक ०७ मार्च, २०२२ पर्यंत सवलतीचे दर १०% ते २५% पर्यंत आकारलेले आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन दिल्याबाबतची मुंबई उपनगर जिल्ह्यात कब्जे हक्काची ७१९ तर भाडेपट्टयाचे एक प्रकरण आणि मुंबई शहर जिल्ह्यात सुमारे १८ भाडेपट्टयाची प्रकरणे आहेत. गृहनिर्माण संस्थेमधील सदनिका हस्तांतरणांबाबत हस्तांतरण शुल्क आकारणेबाबत शासनाने वेळोवेळी धोरण विहित केलेले आहे. त्यानुसार सदनिकांच्या हस्तांतरणासाठी अथवा हस्तांतरण नियमानुकूल करण्याकरिता हस्तांतरण शुल्क भरणे आवश्यक आहे.

तसेच, भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीच्या भोगवटादार वर्ग-१ मधील रुपांतरणासाठी आकारावयाच्या अधिमूल्यांच्या वरील सवलतीच्या दरांना दिनांक ०७ मार्च, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यास राज्य मंत्रीमंडळाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील वृक्ष लागवड योजनेची चौकशी करण्याबाबत

**(२) * १७२०० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात मागील चार वर्षांमध्ये करण्यात आलेली वृक्ष लागवड केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात जिवंत राहिलेल्या झाडांची संख्या अत्यल्प असल्याने या योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील चार वर्षांतील सर्व विभागाने केलेल्या वृक्ष लागवड योजनेची राज्यस्तरीय पथकांकडून चौकशी करण्यात यावी तसेच उपरोक्त वृक्ष लागवड योजनेची जिओ टॅगिंग, जीपीएस लोकेशन, अक्षांश रेखांशासह पाहणी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (रोहयो), छत्रपती संभाजीनगर यांच्या दुर्लक्षामुळे कोट्यवधी रूपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वृक्ष लागवड प्रकरणी आलेल्या अपयशास जबाबदार असलेल्या संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण छत्रपती संभाजीनगर वृनवृत्तातील खालील विभागाअंतर्गत सन २०१९ चे पावसाळ्यात ३३ कोटी वृक्षलागवड अंतर्गत रोपे लावण्यात आली व मागील चार वर्षात राज्य योजनेतून खालीलप्रमाणे वर्षनिहाय वृक्षलागवड करण्यात आलेली आहे.

| वनवृत्त | लागवड वर्ष | रोपवनांची एकूण संख्या | लागवड केलेल्या रोपांची संख्या | जिवंत रोपांची संख्या | जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर वृत्त | २०१९ | २२६९ | १७६६९१५० | १३९७६५५७ | सदर रोपवने ही संबंधित यंत्रणेस हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. |
| | २०२० | ० | ० | ०.०० | कोविड-१९ मुळे रोपवनांची कामे निरंक |
| | २०२१ | ७९० | १६५१०४१ | १४२२५४६ | ७५.५६ |
| | २०२२ | १०३९ | १९०६१५६ | १७८८७६६ | ९४.९८ |
| **एकूण** | | **४०९८** | **२१२२६३४७** | **१७१८७८६९** | |

वर्षनिहाय केलेल्या रोपवनाची माहिती ही शासनाच्या https://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
(३), (४), (५) व (६) परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदन दिलेले आहे. सामाजिक वनीकरण लागवड कार्यक्रमात वृक्ष लागवड बाबत झालेल्या अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी परभणी, लातूर व धाराशिव यांची चौकशी समिती स्थापन करुन विविध कामांची चौकशी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र भोकर यांना निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) * १७०८५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषि सहाय्यकांची १७५७ पदे रिक्त असून कृषि क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांमध्ये प्रचार व प्रसार करण्याचे मुख्य काम तसेच कृषि क्षेत्रातील ४० ते ५० योजनांचे लक्ष्य गाठण्याचे काम कृषि सहाय्यकांना करावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि सहाय्यकांची पदे रिक्त असल्यामुळे शेतकऱ्यांना सेवा मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यरत कृषि सहाय्यकांना १० ते १५ गावांचा अतिरिक्त पदभार सोपविल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण येत असून कृषि सहाय्यकांची रिक्त पदे भरण्यात येत नसल्यामुळे कृषि पदवीधर बेरोजगारांमधे असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात कृषि विभागांतर्गतच्या विविध विभागातील मंजूर आकृतीबंधानुसार कृषि सहाय्यकांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

कृषि विभागात कृषि सहाय्यकांची ११५९९ मंजूर पदे असून यापैकी माहे फेब्रुवारी, २०२३ अखेर ९४८४ पदे भरलेली असून २११५ पदे रिक्त आहेत. कृषि सहाय्यकांच्या एकूण मंजूर पदसंख्येचा विचार करता सद्य:स्थितीत रिक्त पदांचे प्रमाण १८ टक्के आहे.
(२), (३) व (४) करिता कृषि सहाय्यकांचा रिक्त पदांचा अतिरीक्त पदभार नजिकच्या कृषि सहाय्यक यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून शेतकऱ्यांना सेवा मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे.

कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वित्त विभाग, शा.नि.दिनांक ०४/०५/२०२० अन्वये पदभरतीवर निर्बंध लावण्यात आलेले होते. सदर निर्बंध वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिथिल करण्यात आले असून ज्या विभागांचा सुधारित आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतिम झालेला नसल्यामुळे कृषि सहायक संवर्गाची रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. त्यासाठी सर्व विभागीय कृषि सहसंचालक स्तरावरुन बिंदुनामावल्या तपासून घेण्यात आलेल्या आहेत.

दरम्यान सा.प्र.वि., शासन निर्णय दिनांक ०१/०२/२०२३ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदे निश्चित करण्याचे निकष बदलण्यात आलेले आहेत. त्यानुसार कृषि सहाय्यक संवर्गाची सुधारीत बिंदुनामावली प्रमाणित करुन घ्यावयाची कार्यवाही संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावर सुरु आहे. सुधारित बिंदुनामावली प्रमाणित झाल्यानंतर कृषि सहाय्यक पदभरतीची पुढील नियमोचित कार्यवाही प्राथम्यक्रमाने करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(४) * १७७९८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: यवतमाळ जिल्ह्यात सन २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या १,२८,४६४ शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नसून कर्जमाफीची रुपये ३८९ कोटी ६५ लाख एवढी रक्कम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यात नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या ९० टक्के शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर अनुदान प्राप्त झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या व प्रोत्साहनपर अनुदानाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२) नाही. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील एकूण ३४,११८ लाभार्थ्यांना रुपये ६५.३४ कोटी इतक्या प्रोत्साहनपर रक्कमेचा लाभ वितरित करण्यात आला आहे.
(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेंतर्गत लाभ प्रदान करावयाच्या कर्जखात्यांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबत त्याचप्रमाणे सदर योजनेची संगणकीय प्रणाली/पोर्टल कार्यान्वित करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील लम्पी रोगामुळे मृत्यू झालेल्या पशुधनांच्या पशुपालकांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(५) * १७५७१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील ३३,९८६ पशुधनांना लम्पी रोगाची बाधा झाली असून २९४९ पशुधनांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत्यू झालेल्या २९४९ पशुधनांपैकी ११६९ पशुपालकांना आर्थिक मदत मिळाली असून १७८० पशुपालकांना मदत मिळणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लम्पी रोगाच्या प्रादुर्भावामुळे बाधित झालेल्या पशुधनांवर उपचार करण्यासाठी शासनाकडून खाजगी कंपनीमार्फत ५० पेक्षा अधिक पशुधन पर्यवेक्षकांची तीन महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे मागील दोन महिन्यांचे वेतन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत झालेल्या पशुधनांच्या पशुपालकांना झालेल्या नुकसानीपोटी आर्थिक मदत तसेच कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या पर्यवेक्षकांचे प्रलंबित वेतन अदा करुन त्यांना मुदतवाढ देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) सोलापूर जिल्ह्यात दिनांक ०५/०१/२०२३ अखेर एकूण मृत २,९४९ पशुधनांपैकी ९१० मृत पशुधनांच्या मालकांना एकूण रुपये २.२२ कोटी अर्थसहाय्य थेट लाभ हस्तांतरणाद्वारे प्रत्यक्ष अदा करण्यात आलेले आहे.

सोलापूर जिल्ह्यास अर्थसहाय्य अदा करण्यासाठी एकूण रुपये ७.६० कोटी निधी वितरित करण्यात आलेला असून, दिनांक ०७/०३/२०२३ अखेर २,१६१ मृत पशुधनाच्या मालकांना एकूण रुपये ५.२२ कोटी अर्थसहाय्याचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेले असून, उर्वरित मृत पशुधनाच्या मालकांना अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सोलापूर जिल्ह्यामध्ये ०२ पशुधन विकास अधिकारी, ५० जिल्हास्तरीय पशुधन पर्यवेक्षक व ०२ राज्यस्तरीय पशुधन पर्यवेक्षक यांच्या नेमणूका ३ महिने कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे करण्यात आलेल्या होत्या. संबंधितांना माहे ऑक्टोबर, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीचे मानधन अदा करण्यात आलेले आहे.

(४) व (५) सोलापूर जिल्ह्यातील उर्वरित मृत पशुधनाच्या मालकांना अर्थसहाय्य अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सोलापूर जिल्ह्यात यापुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी १० पशुधन विकास अधिकारी, गट-अ, ०२ राज्यस्तरीय पशुधन पर्यवेक्षकांच्या नेमणूका बाह्ययंत्रणेद्वारे करण्यात आलेल्या असून, जिल्हा परिषदस्तरीय ५२ पशुधन पर्यवेक्षकांच्या ११ महिने कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूका करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण विभागातील प्रादेशिक उपसंचालक या पदावरील नियुक्तीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याबाबत

**(६) * १७८३५ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे विभाजन करुन दिनांक ९ मार्च, २०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागाची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने निर्माण केलेल्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे कामकाज चालविण्याकरिता नवीन अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र भरती होईपर्यंत इतर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीने पद:स्थापना करण्याबाबत शासनामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात येऊन इतर मागास बहुजन कल्याण विभागात काम करण्यास इच्छुक असलेल्या इतर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे मागविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीचे कामकाज अत्यंत महत्वाचे असल्याने सदर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची इतर मागास बहुजन कल्याण विभागात प्रतिनियुक्तीने नियुक्ती न करता इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी असा निर्णय मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीत दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असे असतानाही दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास प्रादेशिक उपसंचालक या पदाकरिता एकूण ५ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत केलेल्या शिफारशींपैकी ३ अधिकारी हे उपायुक्त, जिल्हा जातपडताळणी समिती या पदावर कार्यरत असतानाही तसेच त्यापैंकी लातूर प्रादेशिक विभागात पद:स्थापना देण्यात आलेल्या एका अधिकाऱ्यावर यापूर्वीच गैरव्यवहार केल्याप्रकरणी सी.आय.डी. चौकशी सुरु असतानाही सदर ५ अधिकाऱ्यांची इतर मागास बहुजन कल्याण विभागात दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रतिनियुक्तीने पद:स्थापना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इतर मागास बहुजन कल्याण विभागातील प्रादेशिक उपसंचालक या पदावरील नियुक्ती प्रक्रिया रद्द करुन पुन्हा पारदर्शक पद्धतीने सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) तत्कालीन मा.मंत्री (इ.मा.ब.क) यांच्या अध्यक्षतेखाली व मा.मुख्य सचिवांच्या उपस्थितीत दिनांक ०६/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हा जाती/ जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीवर कार्यरत अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती न करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर, तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सामाजिक न्याय विभागाच्या जातपडताळणी समितीवर कार्यरत अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागात प्रतिनियुक्तीने नियुक्तीची इच्छुकता दर्शविली आहे अशा उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सेवा उपलब्ध करुन दिलेल्या जातपडताळणी समितीवरील अधिकाऱ्यांची या विभागातील उपसंचालक पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली. तथापि, जातपडताळणी समितीचा पदभार त्या विभागाने अन्य अधिकाऱ्याकडे सुपूर्द केला आहे. लातूर प्रादेशिक विभागात प्रतिनियुक्तीने पद:स्थापना देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर सी.आय.डी. चौकशी चालू नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सालवडगाव (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील हनुमान वस्तीकरिता रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) * १६९९९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सालवडगाव (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील सुमारे ३५० लोकवस्ती असलेल्या हनुमान वस्तीवर येण्या-जाण्यासाठी रस्ता नसल्याने या वस्तीवरील कुटुंबियांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हनुमान वस्तीवर येण्या-जाण्यासाठी रस्ता नसल्याने शालेय विद्यार्थ्यांची आणि आजारी व्यक्तींची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सालवडगाव (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील हनुमान वस्तीवर येण्या-जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शेत रस्त्याची पहाणी करण्यात आली आहे, सदर योजनाबाह्य रस्त्याकरिता मातोश्री ग्राम समृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात वाढीव दराने वाळूची विक्री होत असल्याबाबत

**(८) * १८०४३ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात वाळू घाटाचे लिलाव होवूनही वाळूमाफियांकडून वाळूचा तुटवडा दाखवून सामान्य जनतेला वाढीव दराने वाळूची विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने सामान्य जनतेला रास्त दरात वाळू उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) चंद्रपूर जिल्ह्यात ४० वाळूघाटाचे लिलाव होऊन १,९६,३२४ इतक्या ब्रास रेतीसाठी सर्वोच्च बोलीद्वारे रुपये ३१.०१/- कोटी इतका महसूल प्राप्त झाला आहे. त्यामधून खरेदीदाराकडून जास्त दराने रेती घेऊन फसवणूक केल्याबाबतची तक्रार वा निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अकृषिक करप्रणालीचा फेरविचार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(९) * १८४२९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अकृषिक कराच्या बोजातून नागरिक, गृहनिर्माण संस्थांना दिलासा देण्यासाठी सध्याच्या अकृषिक करप्रणालीचा फेरविचार करण्यासाठी शासनाने दिनांक ६ जून, २०२२ रोजी महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीच्या बैठका वेळोवेळी आयोजित करण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल अद्यापपर्यंत सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील अकृषिक करप्रणालीचा फेरविचार करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) राज्यातील सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, आकारणीच्या वसुलीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत व त्यासंदर्भात करावयाच्या अनुषंगिक अंमलबजावणीत सुसूत्रता आणण्याकरिता सर्वंकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारस करण्याकरिता अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती दिनांक ०६ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आली आहे.

सदर अभ्यास समितीच्या दिनांक ०९/०६/२०२२ व दिनांक २९/०८/२०२२ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर समितीचा अहवाल लवकरच शासनास सादर करण्याचे योजिले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यामध्ये अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक होत असल्याबाबत

**(१०) * १८२०० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीपात्रात गावालगत असलेल्या पुलाच्या आजूबाजूच्या परिसरात अवैध वाळू उपसा होत असून वाळू उपशामुळे पुलाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगाव शहरात उपविभागीय अधिकारी यांच्या पथकाकडून वाळूचे अवैध वाहतूक करणारे डंपर पकडण्यात आल्याने डंपरमध्ये बसलेल्या वाहनचालकाने अधिकाऱ्यांस खाली ढकलून अवैध वाहतूक करून शासनाचा महसूल बुडविल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यात गिरणा नदी पात्रालगत गावाकडे येणाऱ्या रस्त्यांवर तसेच नदीपात्रातील पुलाच्या आजूबाजूच्या परिसरात होत असलेला अवैध वाळू उपसा बंद करुन पुलाचा धोका टाळण्याकरिता तसेच उप विभागीय अधिकाऱ्यांवर हल्ले करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी जळगाव व एरंडोल यांनी गिरणा नदीवरील पश्चिम रेल्वे पुल व राष्ट्रीय महामार्गाच्या पुलाच्या दोन्ही बाजूस ६०० मीटरच्या आत कोणत्याही वाहनास प्रवेश करण्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १४४ अन्वये मनाई आदेश पारित केले आहेत. गिरणा नदीपात्रातील अवैध वाळू उपशामुळे नदीवरील पुलाला आजरोजी कुठल्याही प्रकारचा धोका निर्माण झालेला नसल्याबाबत प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगाव यांनी कळविलेले आहे.

उपविभागीय अधिकारी, जळगांव यांच्या पथकाने दिनांक २४/१२/२०२२ रोजी गस्तीवर असताना एक डंपर अंदाजे ०३ ब्रास वाळू अवैधरित्या वाहतूक करताना पकडला. वाहन जप्त करताना डंपरच्या वाहनचालकाने अधिकाऱ्यास जबरदस्तीने वाहनातून खाली ढकलून दिल्याने संबंधिताविरुद्ध शनिपेठ पोलीस स्टेशन, जळगाव येथे गु.र.नं. ०२४०/२०२२ भा.द.वि. च्या कलम ३४, ३५३ व ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

जळगाव जिल्ह्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतुकीस आळा घालण्यासाठी गाव पातळीवर ग्राम दक्षता पथक, तसेच, महसूल, परिवहन व पोलीस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात. जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीपात्रालगत असलेल्या गावामध्ये नदीपात्रातून गावाकडे येणारे रस्ते जे.सी.बी.च्या साहाय्याने चर खोदून बंद करण्यात आलेले आहेत.

जळगाव जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०२२ ते दिनांक ३१/०१/२०२३ दरम्यान गौण खनिजाच्या अवैध उत्खनन, वाहतूक प्रकरणी एकूण ५०८ प्रकरणांमध्ये ६९५.८३ लाख रुपये दंडाची आकारणी करण्यात येवून ३६१.०८ लाख रुपये दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच ६६ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

-----------------

## दि राजलक्ष्मी अर्बन को.ऑप.बँक लि., नाशिक येथील निवडणुकीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अनियमितता केल्याबाबत

**(११)** * **१८४१५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि राजलक्ष्मी अर्बन को.ऑप.बँक लि., नाशिक येथील पंचवार्षिक निवडणुकीमध्ये श्री.सतिश खरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक यांनी विशिष्ट उमेदवार निवडून येण्यासाठी आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर केल्याचे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.सतिश खरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, नाशिक यांनी निवडणूकीच्या कामकाजात केलेल्या अनियमिततेमुळे त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी करण्यात आली असून उक्त प्रकरणी त्यांच्यावरील दोषारोप सिद्ध झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणी चौकशी अहवालानुसार संबंधितांविरोधात दंडात्मक कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) दि राजलक्ष्मी अर्बन को. ऑप. बँक लि., नाशिक या बँकेच्या निवडणुकीसंदर्भात श्री.सतीश खरे, तत्कालीन विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याविरुद्ध राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली होती. त्यानुषंगाने, शासनाकडून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असून, त्यासंदर्भात चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनामार्फत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याकडून अभिप्राय मागविले असून, सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगवी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे उपजिल्हाधिकारी महिलेने गैरमार्गाने जमीन खरेदी केल्याबाबत

**(१२) * १८४३७ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगवी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील खाते क्र. १५८, १८५ व ३८७ मधील ५० एकर जमीन महिला उपजिल्हाधिकारी यांचे पतीच्या नावे गैरमार्गाने खरेदी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महिला उपजिल्हाधिकारी यांनी भिवंडी, पालघर व पुनर्वसन शाखा, ठाणे येथे कार्यरत असताना गैरव्यवहार केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खरेदी केलेल्या जमिनीलगत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी कसण्यास महिला उपजिल्हाधिकारी यांनी विरोध दर्शवून संपूर्ण जागेला अवैधरित्या कंपाऊंड केल्यामुळे गत ८ ते १० वर्षांपासून सदरची जमीन पडीक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपजिल्हाधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांनी तहसिलदार, कर्जत व पोलीस निरीक्षक, कर्जत यांचेकडे वारंवार निवेदन व तक्रारी केल्या असतानाही सदर महिला उपजिल्हाधिकारी यांच्यावर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी यांनी खरेदी केलेल्या जमिनीची चौकशी करण्यात येऊन दोषींविरुद्ध कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सद्य:स्थितीत मौजे सांगवी ता.कर्जत, जि.रायगड या गावी खाते क्र. १५८, १८५, ३८७ गाव अभिलेख पहाता, सदरचे खाते क्रमांक (गाव नमुना ८-अ) गाव अभिलेखात दिसून येत नाहीत. मात्र, मौजे खांडपे, ता.कर्जत, जि.रायगड येथे उक्त खाते क्रमांक उपलब्ध आहेत. मौजे खांडपे येथील खाते क्र.१८५ व खाते क्र.३८७ यामधील क्षेत्र श्री.गायकर व श्री.बेडेकर यांचे नावे सामाईकात व खाते क्र. १५८ यामधील क्षेत्र श्री.गायकर यांच्या नावे आहे.

उक्त नमूद खाते क्रमांक १५८, १८५ व ३८७ या क्षेत्रासह इतरांच्या मालकीची खाते क्रमांक ४२, ८३, ७१ (सर्व्हे नं.५३/५, ५४/८), ११, ४१० क्षेत्राला तारेचे कम्पाऊंड करण्यात आले असून सदर कम्पाऊंडमध्ये मिळकती असलेल्या शेतकऱ्यांनी मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी रस्ता उपलब्ध नसल्याने रस्ता मिळणेकामी तहसिलदार, कर्जत यांचेकडे अर्ज केलेला आहे. सदरचे प्रकरण तहसिलदार, कर्जत यांचेकडे सुनावणीकरिता प्रलंबित आहे. तसेच, मिळकतीच्या ७/१२ सदरी राबपड असल्याचे दिसून येत आहे.

महिला उपजिल्हाधिकारी या उप विभागीय अधिकारी, भिवंडी या पदावर कार्यरत कालावधीतील त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली असून शिक्षा बजाविण्यात आली आहे.

महिला उपजिल्हाधिकारी यांचे विरुद्ध जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे. तसेच, श्री.शिंगोळे यांनी श्री.गायकर यांची सखोल चौकशी करण्याबाबत केलेल्या अर्जाबाबत पोलीस निरीक्षक, नेरळ पोलीस ठाणे यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील खैराची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * १८४९० श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील खोडाळा मार्गावर वन अधिकाऱ्यांनी जंगलातून खैराची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या आयशर टेम्पोचा पाठलाग करून खैराचे ६६ तुकडे असलेला टेम्पो पकडला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खैराची वाहतूक करणारा टेम्पो पाली काष्ठ विक्री आगारात जमा करण्यात आला असूनही माहे डिसेंबर, २०२२ मध्ये सदर टेम्पो चोरट्याने पळविण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे सदर घटनेची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाली विक्री आगारात कोट्यवधी रुपयांचा लाकडाचा माल आणि जप्त केलेली वाहने ठेवण्यात आली असूनही सदर जागेत पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या खैराची वाहतूक करणाऱ्या टेम्पो मालक व चालकावर कारवाई करण्याबाबत तसेच जंगलातील भागात तपासणी नाका सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) विक्रमगड तालुक्यातील सावा वनपरिक्षेत्रामधील मालकी क्षेत्रातील खैर वृक्षाची तोड करुन तयार केलेला माल विनापरवाना वाहतूक करण्याची बातमी मिळाल्यावरुन नाकाबंदी केली असता दिनांक २९/०१/२०२३ रोजी एक आयशर टेम्पो खैर २१ नग, २.६१५ घ.मी. मालासह खोडाळा-वाडा-भिवंडी रस्त्यावर पकडण्यात येऊन जप्त करण्यात आला आहे. वनक्षेत्रपाल सावा यांच्याकडून सदर वनगुन्ह्यासंबंधात तपास सुरु आहे.

(२) दिनांक २१/१०/२०२२ रोजी रात्री वनोपज अवैधरित्या वाहतूक करताना आयशर टेम्पो खैर ५३ नग, १.०५८ घ.मी. सह जप्त करुन पाली विक्री आगारात ठेवण्यात आला होता.

दिनांक ३०/१२/२०२२ रोजी रात्री आयशर टेम्पो खैर ५३ नग, १.०५८ घ.मी. हा अज्ञात इसमांनी विक्री आगार पाली मागील बाजूस शेती लगतच्या भागातून अंधाराचा फायदा घेऊन वनोपज मालासह येथून पळवून नेला असल्याचे रात्रपाळीसाठी कार्यरत असलेल्या हंगामी वनमजुराच्या दिनांक ३१/१२/२०२२ रोजी निदर्शनास आले. याप्रकरणी क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांनी विक्री आगार व आजूबाजूच्या क्षेत्राची तपासणी केली असता आयशर टेम्पो आढळून आला नाही. त्यामुळे वनरक्षक, विक्री आगार, पाली यांनी आयशर टेम्पो मालासह चोरी झाल्याबाबतची तक्रार वाडा पोलीस स्टेशन येथे नोंदविली असून पोलीस यंत्रणा सदरच्या गुन्ह्याचा तपास करित आहे.

(३) पाली विक्री आगार येथे गुन्हेकाम, कुपाचा माल, आदिवासी मालकीचा माल यांची विक्री करण्याकरिता तयार करण्यात आलेला आहे. तसेच वनगुन्ह्यात जप्त केलेली वाहने सुरक्षिततेच्यादृष्टीने पाली विक्री आगार येथे ठेवण्यात येत असतात. पाली विक्री आगाराचे व्यवस्थापन व संरक्षण इत्यादी तत्सम कामे वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक हे अधिकारी/कर्मचारी वर्ग नियमित नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच सुरक्षेकामी दिवसपाळी व रात्रपाळीकरिता हंगामी वनमजुर ठेवण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीत पाली विक्री आगाराच्या ठिकाणी संरक्षण भिंत तसेच इमारती विद्युतीकरणाची व्यवस्था उपलब्ध नसल्याने सुरक्षिततेच्यादृष्टीने सदर कामे करण्यासंबंधी कार्यवाही सुरू आहे.

(४) जव्हार वन विभागात पश्चिमवाडा, कंचाड व पुर्ववाडा वनक्षेत्रात खाजगी मालकी तसेच सरकारी जंगलात खैर वृक्ष मोठ्या प्रमाणात आहेत. अवैधरित्या खैराची वाहतूक रोखण्यासाठी पश्चिमवाडा वनक्षेत्रात वाडा व देसाई येथे स्थायी स्वरुपाचे नाके आहेत. तसेच विक्रमगड वनक्षेत्रातील पोचाडा येथे संरक्षण कुटी उभारण्यात आली आहे. वनसंरक्षणाच्या बळकटीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून पश्चिमवाडा वनक्षेत्रात सोनशिव मधील राखीव वनात दोन संरक्षण कुटी प्रस्तावीत केल्या आहेत. तसेच अवैध खैर वाहतूक कामी सक्रिय असलेले तस्कर त्यांना साथ देणारे टेम्पो-ट्रक यांचे चालक व मालक यांचा शोध घेण्याकामी वन विभागातील गुप्त सेवा निधी वापर करुन वनखबऱ्यांचे जाळे निर्माण करण्याकामी प्रोत्साहन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करणेबाबत

**(१४) * १८५५३ श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १५३८३ ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १५२ लाख शेतकरी कुटुंबे असताना पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी (पीएम किसान) योजनेसाठी फक्त ११५ लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली असून उर्वरित ३७ लाख शेतकरी कुटुंबे या योजनेसाठी पात्र की अपात्र असा संभ्रम शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सर्व राज्य शासनांना पीएम किसान योजनेंतर्गत सर्व नावे निश्चित करुन यादी अद्ययावत करण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर, २०२२ पर्यंतची मुदत दिलेली असताना सदर यादी अद्याप निश्चित केली नसल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना भूमी अभिलेखांच्या पुराव्यांवरुन राबविण्यात येत असून सर्व अभिलेख हे महसूल विभागाच्या अखत्यारित असून सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांची नोंदणी व मान्यता देण्याचे अधिकार देखील महसूल विभागाकडे आहेत, परंतु सदर योजना कृषि विभागाची असल्याने योजनेच्या अंमलबजावणीचे काम महसूल विभाग करणार नसल्याचे महसूल विभागाने सांगितल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पात्र शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करण्याची मुदत लक्षात घेऊन, महसूल व कृषि विभागांमध्ये समन्वय साधून योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.

कृषि गणना २०१५-१६ नुसार एकूण १५२.८५ लाख वहिती खातेदार संख्या असून त्यापैकी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेसाठी दिनांक ०२/०३/२०२२ अखेर एकूण ११५.९७ लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. योजनेचे निकष स्वयंस्पष्ट असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनामध्ये या बाबतीत कोणताही संभ्रम नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात नोंदणीकृत शेतकऱ्यांपैकी पोर्टलवर पात्र ठरलेल्या ९७.१६ लाख लाभार्थ्यांपैकी एकूण ९३.२३ लाख पात्र लाभार्थ्यांची भूमी अभिलेख नोंदीप्रमाणे माहिती अद्ययावत करण्यात आली आहे. उर्वरित प्रलंबित असलेले एकूण ३.९३ लाख पात्र लाभार्थींची माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर योजनेचे कामकाज सुरळीतपणे होण्यासाठी मा.मंत्री (महसूल) व मा.मंत्री (कृषि) यांचे उपस्थितीत दिनांक २३/०८/२०२२ रोजी बैठक आयोजित करुन कामकाज पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी यांचे समवेत VC द्वारे दिनांक २७/०९/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकारी यांनी महसूल, कृषि व ग्रामविकास विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तसेच, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय प्रकल्प आढावा समितीच्या दिनांक २३/०१/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये PM-KISAN योजनेंतर्गत प्रलंबित असलेल्या बाबींची तात्काळ पूर्तता करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

----------------

## मुरुड (जि.रायगड) येथील समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत असल्याबाबत

**(१५) * १८६४८ श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (जि.रायगड) येथील समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या मच्छिमारांना मासळी मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांना मिळणारे डिझेलचे परतावे मिळाले नसल्याने दिनांक १ ऑगस्ट, २०२२ रोजीपासून सुरु झालेल्या मासेमारी हंगामाचा नैसर्गिक आपत्तीमुळे समुद्रात विविध संकटे आल्याने मच्छिमार बांधवांना उपयोग झाला नसल्याने मच्छिमार बांधवांनी नुकसान भरपाईची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पारंपारिक मासेमारी करणाऱ्या नौका मालकांना व खलाशी वर्गांना नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर मत्स्य दुष्काळाचे संकट आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमार बांधवांना मासेमारी करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी तसेच नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हा कार्यालयास डिझेल तेलावरील प्रतिपूर्ती योजनेंतर्गत माहे फेब्रुवारी, २०२३ अखेर रुपये ३०.२६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असून सद्य:स्थितीत रुपये १९.७६ कोटींचे प्रस्ताव निधी अभावी प्रलंबित आहेत. सदर प्रस्तावांना निधीच्या उपलब्धतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

कोकण विभागातील सागरी जिल्हयांमध्ये झालेली अतिवृष्टी/मुसळधार पाऊस, खराब वातावरणामुळे तसेच हवामान खात्याकडून प्राप्त सतर्कतेच्या इशाऱ्याच्या संदेशानुसार मच्छिमारांना काही कालावधीसाठी मासेमारी करता आलेली नसून मासेमारी नौकांना मासेमारी न करताच परत यावे लागले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सागरी मत्स्य उत्पादनाची सन २०१९-२०२० (४४३५९३ मे.टन), सन २०२०-२०२१ (३९८५११ मे.टन) व सन २०२१-२०२२ (४३२७४८ मे.टन) आकडेवारी पाहता मत्स्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत नाही.

(४) क्यार व महा चक्रीवादळामुळे मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही याकरिता रायगड जिल्ह्याकरिता रुपये ९.२९ कोटी इतके विशेष आर्थिक सहाय्य/अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील सुर नदीपात्रातून वाळूचे अवैधरित्या उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबत

**(१६) * १८७२० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौदा (जि.नागपूर) तालुक्यातील सुर नदीपात्रातून वाळू माफिया प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा व वाळू वाहतूक करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदी पात्रातून वाळूचा उपसा करताना एका विशिष्ट ठिकाणाहून मर्यादित वाळूच्या उपशाची परवानगी घ्यावी लागत असून त्यासाठी शासनास रॉयल्टी भरावी लागते, परंतु सदर भागातून बेकायदेशीरपणे वाळूचे उत्खनन व वाहतूक करणाऱ्या नागपूर जिल्ह्यातील खापा येथील तीन तर सावनेरमधील दोन वाळू तस्करांना जेरबंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सततच्या वाळू उपशामुळे भविष्यात येथील पूल, शेती नदीपात्र, पाणी पुरवठ्याच्या विहिरी धोकादायक होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुरनदी पात्रातील अवैध वाळू वाहतूक रोखण्यासह व वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौदा (जि.नागपूर) तालुक्यात नायब तहसिलदार/मंडळ अधिकारी/तलाठी यांची नियुक्ती करून फिरते पथक स्थापन करण्यात आलेले आहे. माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये अवैध उत्खनन व वाहतूकीत एकूण ०९ प्रकरणामधील ७ प्रकरणात कारवाई करून रुपये ९,०८,५००/- इतका दंड शासन जमा केला आहे तर उर्वरित ०२ प्रकरणांवर कार्यवाही सुरू आहे.

सुर नदीचे क्षेत्र पोलीस स्टेशन, अरोली अंतर्गत असून सन २०२२-२३ मध्ये IPC ३७९ अंतर्गत ११ प्रकरणे दाखल केली आहे. त्यामधील माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये एका प्रकरणात ०२ आरोपींना नोटीस दिली आहे.

वाळू उपसामुळे पूल, शेती नदीपात्र पाणी पुरवठ्याच्या विहिरी धोकादायक होण्याच्या मार्गावर असल्याची बाब आढळून आलेली नाही.

मौदा (जि.नागपूर) तालुक्यात दिनांक १ एप्रिल, २०२२ ते २८ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत ४६ वाहनांवर कारवाई करून रुपये ३६,५०,७२५/- इतका दंड लावण्यात आला असून त्यापैकी रुपये २५,४३,१२५/- इतका दंड शासन जमा केला आहे.

-----------------

## राज्यातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * १७१७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक ६८४३ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचा शेतात काम करताना अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे इजा झाल्यास शेतकऱ्यांना व मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सुरु करण्यात आली असून सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना रुपये दोन लाखांची आर्थिक मदत देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासन निर्णय असतानाही अधिकाऱ्यांमधील असमन्वयामुळे शेतकरी या योजनेपासून वंचित असल्याबाबतची लेखी तक्रार परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी विमा कंपनी व सल्लागारांकरिता शासनामार्फत रुपये ९५ कोटींहून अधिक खर्च करण्यात येत असूनही धाराशिव जिल्ह्यात प्राप्त झालेले अनेक प्रस्ताव विमा कंपनीकडून नाकारण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बहुतांशी प्रकरणांमध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कागदपत्रांअभावी सन २०२० अखेरपर्यंत ४२ तर माहे डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत ९० असे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ देण्याकरिता ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल, आदींची पुर्तता करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, परभणी यांच्या स्तरावरून विशेष मोहिम राबविण्याबाबत तसेच शेतकऱ्यांचे सर्व प्रस्ताव मान्य करून त्यांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

सन २०२१-२२ साठी युनिव्हर्सल सोंपो जनरल इन्शुरंन्स कंपनी लि. ही विमा कंपनी असून त्यांना दिलेला विमा हप्ता रुपये ८८.३७ कोटी आहे व त्यांनी दिलेली नुकसान भरपाई रुपये ६९.७९ कोटी इतकी आहे. तसेच विमा कंपनीकडून विमा दावे निकाली काढण्याची कार्यवाही अद्यापही सुरु आहे. याबाबत कृषि विभागाकडून विमा कंपनीकडे सततचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना सन २०१९-२० व २०२१-२२ या वर्षातील धाराशिव जिल्हयांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | प्राप्त विमा प्रस्ताव | मंजूर विमा प्रस्ताव | नामंजूर विमा प्रस्ताव | कंपनीकडे कार्यवाहीत | कागदपत्रा अभावी प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | २५८ | १८३ | ५२ | ०३ | १९ |
| २०२१-२२ | २१६ | १२२ | १९ | ०२ | ७३ |

(५) प्रलंबित विमा दाव्यांच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर नियमितपणे प्रकरणनिहाय आढावा घेऊन क्षेत्रिय स्तरावरुन आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेण्याची कार्यवाही तसेच त्या अनुषंगाने सातत्याने विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनीच्या कामकाजाचा नियमित पाठपुरावा करुन विमा प्रस्ताव निकाली काढणेसाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहे.

कृषि आयुक्तालय स्तरावरुन देखील योजनेशी संलग्न विभागाकडे प्रलंबित कागदपत्रांसाठी पाठपुरावा करण्यात आलेला आहे. विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनी यांचा नियमित आढावा घेऊन विमा प्रस्ताव निकाली काढण्यात येत आहेत.

सन २०२२-२३ यावर्षात विमा कंपनी कार्यरत नसल्याने दिनांक ०७/०४/२०२२ ते २२/०८/२०२२ पर्यंतच्या योजनेमध्ये पडलेल्या खंडास खंडीत कालावधी म्हणून घोषित करुन सदर कालावधीतील प्रलंबित विमा प्रस्ताव निकाली काढण्यास विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. या कालावधीतील पात्र विमा दाव्यांना निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) सदर योजनेंतर्गत विमा प्रस्ताव हे अपघातग्रस्त शेतकरी/वारसदाराकडून आवश्यक असणाऱ्या ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, शवविच्छेदन अहवाल, पोलीस अंतिम अहवाल, वैध वाहन परवाना इत्यादी कागदपत्रांअभावी प्रलंबित राहतात. या कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## काटोल व नरखेड (जि.नागपूर) तालुक्यात संत्रा पिकावर कोळशी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(१८)** * **१७७३५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल व नरखेड (जि.नागपूर) तालुक्यात संत्रा पिकावर कोळशी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रोगाच्या प्रादुर्भावामुळे झाडांची पाने काळी पडत असून फळांचा रसही कीड शोषून घेत असल्याने संत्रा उत्पादकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोळशी रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्याच्यादृष्टीने तसेच उक्त रोगामुळे नुकसान झालेल्या संत्रा उत्पादकांना आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात संत्रा/मोसंबी पिकाखाली ८८४७ हेक्टर व नरखेड तालुक्यात ११७३७.५० हेक्टर क्षेत्र आहे. माहे जून ते ऑक्टोबर या कालावधीत संत्रा पिकावर काटोल तालुक्यात ५५९ हेक्टर व नरखेड तालुक्यात १८०० हेक्टर क्षेत्रावर कोळशीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव दिसून आला होता.

(२) हे खरे नाही.

(३) कोळशी रोगाचा प्रादुर्भावाच्या अनुषंगाने विद्यापीठ शास्त्रज्ञांच्या क्षेत्रिय भेटी आयोजित करण्यात येवून त्यांचे शिफारशीनुसार शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यानुसार शेतकऱ्यांनी उपाययोजना केल्याने कोळशी रोग नियंत्रणात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कोळीवाडयांतील जमिनी कोळी समाजाच्या नावे करण्याबाबत

**(१९)** * **१८१८७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल विभागाने सीमांकन केल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, धारावी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडा आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट ही शासकीय प्राधिकरणे शिवडी, सायन, धारावी, कुलाबा, माहीम, माहिम मार्केट, वरळी, मांडवी या आठ कोळीवाड्यांमधील हजारो चौरस मीटर जमिनी त्यांच्या अखत्यारित असल्याचा दावा करुन वेगवेगळे आक्षेप नोंदवित असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत एकूण ३३ कोळीवाडे असून बृहन्मुंबई महानगरपालिकेसह महसूल विभागानेही या कोळीवाड्यांचे सीमांकन करून उपरोक्त प्राधिकरणांनी या कोळीवाड्यांमधील काही जमिनींवर आपला हक्क दाखविला असल्याचा अहवाल सादर केला असल्याचे अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने माहितीच्या अधिकाराद्वारे मागविलेल्या माहितीमध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राधिकरणे मुंबईतील कोळीवाड्यांमध्ये विकासकामे करताना विरोध दर्शवित असल्याने सदर कोळीवाडे महसूल विभागाच्या अखत्यारित आणून या जमिनी कोळी समाजाच्या नावे करण्याची मागणी कोळीवाड्यांमधून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यातील कोळीवाड्यांच्या जमिनी महसूल विभागाच्या अंतर्गत येत असल्यामुळे त्या कोळीवाड्यांच्या नावे करण्याची प्रक्रिया सुरु असतानाही मुंबईतील कोळीवाडे व गावठाणे येथील जमिनींवर प्राधिकरणांनी हक्क दाखविणे अयोग्य आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील कोळीवाडे महसूल विभागाच्या अखत्यारित आणून या जमिनी आद्य भूमिपुत्र असलेल्या कोळी समाजाच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने कळविल्यानुसार मुंबई उपनगर जिल्ह्यात २९ व मंबई शहर जिल्ह्यात १२ असे एकूण ४१ कोळीवाडे आहेत. कोळीवाडा सीमांकन हद्दीत समाविष्ट मिळकतींबाबत संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांची सुनावणी घेणेत आली असता मुंबई महानगरपालिका, धारावी पुनर्विकास प्रकल्प, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि तटरक्षक दल, इत्यादी प्राधिकरणांनी व शिवडी सह. गृह निर्माण संस्था यांनी त्यांच्या मिळकती सीमांकन हद्दीमध्ये समाविष्ट होत असल्याने त्याबाबत आक्षेप घेतले आहेत.

(४) ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांमध्ये सागरी किनाऱ्यालगत गावठाण परिसिमेतील घरांचे महास्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन प्लाईंग सर्व्हेचे काम प्रगतीत आहे. किनाऱ्यालगत वसलेल्या मच्छीमार बांधवाच्या गांवठाणातील मिळकती त्यांचे नावावर करण्याची कार्यवाही सुरू आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील कोळीवाडा सीमांकन हद्दीमध्ये समाविष्ट मिळकतींच्या मिळकपत्रिका मूळ भूमापनावेळी/ तद् नंतरचे सर्व्हेक्षण झाले त्या-त्या वेळी उघडणेत आल्या असून त्यावर खाजगी व्यक्ती, संस्था, प्राधिकरण यांची नोंद दाखल असल्याचे निदर्शनास येते.

(५) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील कोळीवाड्यांच्या सीमांकनाची कार्यवाही भूमी अभिलेख विभागामार्फत करण्यात येत आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील कोळीवाडा सीमांकनामध्ये येत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, तटरक्षक दल, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प इत्यादी प्राधिकरणांच्या मिळकती व खाजगी मालकी असलेल्या मिळकती सीमांकनात येत असल्यास त्याबाबत खात्री करून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेस्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोविड-१९ मुळे निधन झालेल्या शेतकऱ्यांचे थकीत कर्ज माफ करण्याबाबत

**(२०) * १८१८४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत निधन झालेल्या कर्जदार शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कोणतेही आर्थिक उत्पन्न नसल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड-१९ मुळे निधन झालेल्या शेतकऱ्यांनी मृत्युपूर्वी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँक, राष्ट्रीयकृत बँक व पतसंस्थांकडून शेती व इतर कामांकरिता कर्ज घेतलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड-१९ मुळे निधन झालेल्या शेतकरी कर्जदारांच्या कुटुंबियांना दिलासा देण्यासाठी शासनामार्फत थकीत कर्जमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोविड-१९ मुळे मृत्यूमुखी पडलेल्या शेतकऱ्यांचे नाव, मंजूर कर्जाची रक्कम, तारण मालमत्तेचा तपशील, थकीत कर्जाची एकूण रक्कम, एनपीए वर्गवारी, वसुलीची सद्य:स्थिती या मुद्यांची माहिती संकलित करण्याबाबत सहकार विभागामार्फत बँकांना निदेशित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाच्या निर्देशानुसार सदर बँकांनी माहिती संकलित केली आहे काय, असल्यास, त्याचा थोडक्यात तपशील काय आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत शेतकऱ्यांच्या संकलित केलेल्या माहितीच्या आधारे शेतकरी कुटुंबियांना थकीत कर्जमाफी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४), (५) व (६) होय. कोविड-१९ मुळे निधन झालेल्या थकीत कर्जदारांची प्राथमिक स्वरुपाची माहिती सहकार आयुक्तालयामार्फत संकलित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुसंवर्धन विभागामधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) * १८२०८ श्री.एकनाथराव खडसे : दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ८९२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे कार्यालयाने पशुसंवर्धन विभागामधील गट-क ची एकूण १३८ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ०३ जुलै, २०१७ रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात येऊन सुधारित आकृतीबंधाच्या संदर्भात वित्त विभागाकडून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने उक्त भरती प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या (माहिती तंत्रज्ञान) शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, २०२१ व दिनांक ४ मार्च, २०२१ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ओएमआर व्हेंडरद्वारे पशुसंवर्धन विभागामधील गट-क संवर्गामधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेने करण्याचे संकल्पित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांची रिक्त असलेली ४३५ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळसेवेने भरण्याकरिता सन २०१९ मध्ये देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक २२ डिसेंबर, २०१९ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात आली असून सदर पदावर कायमस्वरुपी पदभरती होईपर्यंत ११ महिन्यांच्या कालावधीसाठी सदर पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागातील पदे भरण्यास होत असलेला विलंब टाळून पात्र उमेदवार उपलब्ध करुन घेणेसाठी पाठपुरावा करण्यात येऊन उक्त पदे जलदगतीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वित्त विभागाद्वारे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पदभरती वरील निर्बंध शिथिल करण्यात आल्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १७/०१/२०२३ अन्वये सन २०१७ मधील पदभरती रद्द करण्यात येवून, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वाढीव पदांचा समावेश करुन नवीन पदभरती करणेबाबत निर्देश देण्यात आले असून, या अनुषंगाने पदभरतीची प्रक्रिया पार पाडण्यासाठी IBPS कंपनीची निवड करण्यात आली आहे.

(३) जाहिरात क्र. १३/२०१९ च्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे प्राप्त शिफारशींनुसार शासन आदेश दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये एकूण ४२८ उमेदवारांना पशुधन विकास अधिकारी (गट-अ) पदावर नियमित नियुक्ती देण्यात आलेली आहे.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुसंवर्धन विभागातील सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ५६ रिक्त पदे आणि पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २९८ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दिनांक २६/१२/२०२२ रोजी चाळणी परीक्षा झालेली आहे. या अनुषंगाने आयोगाद्वारे उमेदवारांची निवड होवून विभागास शिफारस प्राप्त झाल्यानंतर सदरहू रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये पशुसंवर्धन आयुक्तालयांतर्गत पशुधन पर्यवेक्षक (गट-क) संवर्गातील व वरिष्ठ लिपिक (गट-क) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता IBPS (इंस्टीटयुट ऑफ बॅकींग पर्सोनल सिलेक्शन) कंपनीची निवड करण्यात आली असून, पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाळवा व शिराळा (जि.सांगली) तालुक्यात तसेच कोल्हापूर जिल्ह्यात भेसळयुक्त ताडीची विक्री होत असल्याबाबत

**(२२) * १८४९९ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळवा व शिराळा (जि.सांगली) तालुक्यात भेसळयुक्त ताडीची विक्री मोठ्या प्रमाणात सुरु असून त्यात नशेच्या गोळया, औषधांचा वापर जास्त प्रमाणात होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भेसळयुक्त ताडीमुळे मानवी शरीरावर गंभीर परिणाम होत असून लिव्हर, किडनी निकामी होण्याची शक्यता वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भेडसगाव, शितूर, वारुण, कांडवण (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) व जाधववाडी, कोकरुड (ता.शिराळा, जि.सांगली) येथे भेसळयुक्त ताडीची मोठ्या प्रमाणात विक्री होत असून ताडी-माडी पिणाऱ्यांमध्ये स्थानिक लोकांची संख्या कमी असली तरीही १५ वर्षावरील युवकांची संख्या जास्त असूनही राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून याची दखलही घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भेसळयुक्त ताडी विकणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) दिनांक २४/०२/२०२३ रोजी कुंडलवाडी, ता.वाळवा या ठिकाणी बेकायदेशीरपणे ताडी विक्री संदर्भात गु.र.क्र.२१/२०२३ नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त ताडी नमुन्याचा रासायनिक पृथक्करण अहवाल अप्राप्त असल्यामुळे भेसळीबाबत सद्यःस्थितीत निश्चितपणे नमूद करता येत नाही.
(२) भेसळयुक्त ताडी सेवनाचे दुष्परिणाम होतात ही बाब खरी आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, सदर ठिकाणी बेकायदेशीरपणे ताडी विक्री केली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. माहे जानेवारी, २०२२ पासून ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर मध्ये ३ गुन्हे व ता.वाळवा, जि.सांगली मध्ये ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

वाळवा तालुक्यात ताडी विक्रीची ५ दुकाने मंजूर करण्यात आली आहेत. सदर दुकानांचे वेळोवेळी निरीक्षण करण्यात येऊन ताडीचे नमुने रासायनिक तपासणीकरिता मे. हाफकीन प्रशिक्षण, संशोधन आणि चाचणी संस्था, परळ, मुंबई येथे पाठविले जातात.

नियमानुसार २१ वर्षांवरील इसमांना ताडी सेवन करण्याची मुभा आहे. २१ वर्षांखालील युवकांना ताडी पिण्यासाठी दिली जाते याबाबत तक्रार प्राप्त नाही. तसेच, १५ वर्षांखालील युवक ताडी सेवन करण्यासाठी उक्त मंजूर दुकानात येतात ही बाब तपासणीवेळी आढळून आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथे अत्याधुनिक चित्रनगरी उभारण्याबाबत

**(२३)** * **१८५८६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्ये मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- कार्ये

(१) मुंबई येथील ५२१ एकर जागेवर अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली चित्रनगरी (फिल्मसिटी) उभारण्यात येणार असल्याचे मा.सांस्कृतिक कार्यमंत्री व मा.पर्यटन मंत्री यांनी जाहिर केले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विमानतळावर येणाऱ्या पर्यटकांसाठी व्यवस्था विकसित करणे, मुंबई विमानतळाजवळील १०४ चौ. कि.मी चा असलेला पार्क व त्यासोबत चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी राज्यातील ६५ पर्यटनस्थळे सोयी सुविधांसह विकसित करणे शासनाच्या विचाराधीन असल्याची बाब मा.मंत्री महोदयांनी घोषित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई येथे अत्याधुनिक चित्रनगरी (फिल्मसिटी) उभारण्याबाबत तसेच राज्यातील ६५ पर्यटन स्थळे विकसित करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) , (२) व (३) अंशत: खरे आहे.

मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी मुंबई येथील ५२१ एकर जागेवर अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली चित्रपटसृष्टी (फिल्मसिटी) उभारण्यात येणार असल्याचे व मुंबई विमानतळावर येणाऱ्या पर्यटकांसाठी व्यवस्था विकसित करणे, मुंबई विमानतळाजवळील १०४ चौ.

कि.मी. चा असलेला पार्क व त्यासोबत चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी राज्यातील ६५ पर्यटनस्थळे सोयी सुविधांसह विकसित करण्यात येणार असल्याचे जाहिर केले.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, गोरेगाव, मुंबई या महामंडळास सन १९७७ मध्ये चित्रनगरीकरिता ५२१ एकर जमीन प्रदान केलेली असून, विविध योजनेतून चित्रनगरीच्या आधुनिकीकरणाची कार्यवाही सुरु आहे.

चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी राज्यातील महत्वाच्या पर्यटन स्थळांची स्थळनिश्चिती करुन, चित्रीकरणासाठी व्यवहार्य बाबी तपासणीअंती विकास करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, त्याच स्थळांची निर्मिती चित्रनगरीमध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये करता येईल किंवा कसे, याबाबतची देखील व्यवहार्यता तपासून कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रांजणी (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथील ड्रायपोर्ट प्रकल्पाचे काम रोखण्याबाबत

**(२४) * १८६५२ श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणी (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी पालन केंद्राच्या जागेवर ड्रायपोर्ट उभारण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन प्रकल्पासाठी २२०० एकर जागा राखीव असून या केंद्रातून दरवर्षी हजारो शेळ्या-मेंढ्यांचा पुरवठा होत आहे त्यामुळे पशुपालन योजनांसाठीही येथूनच पिल्ले घेण्याची अट निर्धारित केली असल्याने सदर ठिकाणी ड्रायपोर्ट उभारणे योग्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा धनगर समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असून शेळी-मेंढी पालनाचे प्रशिक्षण तसेच नवनवीन संशोधन व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी या जागेचा वापर होणे अपेक्षित असून सदर जागा विस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यास धनगर समाजाने आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रांजणी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी पालन प्रकल्पाच्या जागेवर उभारण्यात येणारे ड्रायपोर्ट प्रकल्पाचे काम रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) मौजे रांजणी (ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाचे प्रक्षेत्र आहे. या प्रक्षेत्राची सुमारे ७१५.४५ हेक्टर जमीन असून त्याठिकाणी शेळ्या व मेंढ्याचे पालनपोषण करण्यात येते.

तसेच प्रक्षेत्रावरील शेळया मेंढ्यासाठी चारा लागवड करण्यात येते. त्याव्यतिरिक्त राज्यस्तरिय व जिल्हास्तरिय योजनेमध्ये या प्रक्षेत्राच्या कार्यकक्षेतील लाभार्थ्यांना शेळया मेंढयाचे गट वाटप करण्यात येतात.

या प्रक्षेत्रावर ड्रायपोर्ट उभारण्याबाबत कोणताही प्रस्ताव या विभागाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषि अभियंत्यांनी केलेल्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२५) * १८७२८ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील कृषि अभियंत्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ परिसरात सलग २० दिवसांपासून राज्य लोकसेवा आयोगाच्या विरोधात विविध मागण्यासाठी आंदोलन केले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनात कृषि अभियांत्रिकी शाखेचे स्वतंत्र संचालनालय स्थापन करणे, मृद व जलसंधारण विभागात कृषि अभियांत्रिकी शाखेचा समावेश करणे, राज्य लोकसेवा परीक्षेत कृषि अभियांत्रिकी हा वैकल्पिक विषय समाविष्ट करणे, इत्यादी मागण्याचा समावेश असून सदर मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषि अभियांत्रिकी शाखेचे स्वतंत्र संचालनालय स्थापन करण्याबाबत केंद्र सरकारनेही निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कृषि सेवा परिक्षेत यापूर्वी ४०० पैकी २०० गुण कृषि अभियांत्रिकी शाखेला होते, परंतु सदर गुण २०० वरून कमी करून १६ करण्यात आले असल्यामुळे भविष्यात कृषि अभियांत्रिकी शाखा बंद होणार असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषि अभियत्यांनी केलेल्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात सन २०१९ पर्यंत महाराष्ट्र कृषि सेवा (मुख्य) परिक्षेसाठी पेपर क्र.२ हा कृषि अथवा कृषि अभियांत्रिकीसाठी वैकल्पिक विषय प्रत्येकी २०० गुणांचा स्वतंत्र पेपरचा समावेश होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०२१ मध्ये लागू केलेल्या सुधारित अभ्यासक्रमामध्ये पेपर क्र.२ साठी पूर्वी असलेली वैकल्पिक विषयाची तरतूद रद्द केली असून विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता विचारात घेवून गुणांचे भारांकन निश्चित केलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि मधील सर्व विद्याशाखांसाठी २०० गुणांचा समान पेपर क्रमांक २ लागू केला आहे. त्यामध्ये कृषि अभियांत्रिकी या विद्याशाखेकरिता एकूण १६ गुणांचा अभ्यासक्रम निश्चित केलेला आहे.

(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कृषि परिक्षेच्या अभ्यासक्रम तयार करण्याकरिता विद्यापीठाच्या कुलगुरुंकडून प्राप्त झालेली तीन तज्ञांची नावे अंतिम केलेली होती व सदर समितीकडून तयार केलेला अभ्यासक्रम लोकसेवा आयोगाच्या बैठकीमध्ये सादर करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने तो अंतिम करण्यात आला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही सांविधानिक व स्वायत्त संस्था असून स्पर्धा परिक्षेसाठी अभ्यासक्रम व परीक्षा निश्चित करणे ही बाब संपूर्णत: आयोगाच्या अखत्यारितील आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अंतिम केलेला अभ्यासक्रम व परीक्षा योजनेनुसार परीक्षार्थींनी परीक्षेला सामोरे जाणे आवश्यक असल्याचे लोकसेवा आयोगाने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या कामासाठी अवैधरित्या गौण खनिज उत्खनन केलेल्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत

**(२६) * १८६३३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाचे अवैधपणे उत्खनन केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या उभारणीसाठी रस्त्याचे काम करणाऱ्या बांधकाम कंत्राटदारांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ४६ मधील उप-नियमान्वये गौण खनिजाच्या उत्खननावर स्वामित्व धन आकारण्यापासून सूट देण्यात आली असून त्यांना गौण खनिज उत्खननाबाबत परवानगी देण्यासाठी विशिष्ट कार्यपद्धती नेमून देण्यात आली असतानाही सदरहू कंत्राटदारांनी जास्त प्रमाणात उत्खनन केले असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत संबंधित विभागाकडून सुरुवात करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कारवाईस शासनाकडून स्थगिती देण्यात आली असून शासनाची फसवणूक करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यास स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कारवाईस दिलेल्या स्थगितीचा निर्णय रद्द करुन अवैधपणे उत्खनन करणाऱ्या संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) शासन परिपत्रक क्र. गौखनि १०/१२१८/प्र.क्र.४६८/ख दिनांक २७/०५/२०१९ अन्वये नागपुर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्गासाठी गौण खनिज उत्खननाबाबत परवानगी देण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गासाठी प्रकल्प प्रवर्तकाना विकासकाने/ कंत्राटदाराने प्रकल्पा अंतर्गत घोषित भूखंडावरील गौण खनिजाचा वापर करण्यासाठी तसेच सदर मंजूर प्रकल्पांतर्गत क्षेत्राच्या बाहेरुन उत्खनन करून आणवयाच्या गौण खनिजावरील स्वामित्वधनातून १०० टक्के सुट देण्यात आलेली आहे. तथापि, काही कंत्राटदाराने परवानगी पेक्षा अधिकचे उत्खनन केल्यामुळे तसेच परवानगी न घेता केलेले उत्खनन यावर दंडाची कारवाई केली.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे राज्याच्या दृष्टीने महत्व विचारात घेता सदर महामार्गाच्या बांधकामासाठी अनाधिकृत उत्खनन करुन वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या अनुषंगाने क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाईचे आदेश व क्षेत्रिय महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सुरु असलेली सर्व प्रकरणे रद्द करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने मा.मंत्रीमंडळापुढे सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रीमंडळाच्या दिनांक १७/११/२०२२ च्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाबाबत क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाईचे आदेश व क्षेत्रिय महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सध्या सुरु असलेली सर्व प्रकरणे रद्द करण्यात आली आहे.

-----------------

## “भू करमापक तथा लिपिक–टंकलेखक” पदाच्या परिक्षेच्या निकालात चूका करणाऱ्या आयबीपीएस कंपनीविरुद्ध कारवाई करणेबाबत

**(२७) * १८१९२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल विभागाच्या अखत्यारित असलेल्या भूमी अभिलेख विभागाकडून “भू-करमापक तथा लिपिक–टंकलेखक” पदासाठी दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ ते ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालावधीत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेचा निकाल घोषित करण्यात आला असून त्यात अनेक चुका असल्याने उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परीक्षा ही आयबीपीएस या कंपनीमार्फत घेण्यात येऊन या परीक्षेतील सर्व उमेदवारांचा गुणानुक्रमे निकाल जाहिर करण्यात आला असून यादीतील काही उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधून अर्ज सादर केला असतानाही त्यांना खुल्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आल्याचे व काही उमेदवारांचे जन्मवर्ष स्वातंत्र्य वर्षापूर्वीचे दाखविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूमी अभिलेख विभागाकडून “भू-करमापक तथा लिपिक–टंकलेखक” पदासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेच्या निकालातील चुका दुरुस्त करण्याबाबत तसेच परीक्षेच्या निकालात चुका करणाऱ्या आयबीपीएस कंपनीविरोधात कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

महसूल विभागाच्या अखत्यारितील भूमि अभिलेख विभागाकडून भू-करमापक तथा लिपिक-टंकलेखक पदासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेचा गुणानुक्रमे निकाल दिनांक २१/०१/२०२३ रोजी घोषित झाल्यानंतर निकालात जातीचा प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाच्या तपशीलामध्ये तफावत

असल्याबाबतच्या त्रुटी उमेदवारांनी कळविल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त गुणांबाबत कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही.

त्याअनुषंगाने उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना भरलेली माहिती व IBPS कंपनीकडून प्राप्त निकालाची तुलना केली असता, उमेदवारांनी मूळ अर्जात नमुद केलेले जातीचे प्रवर्ग व इतर तपशीलामध्ये, कोणताही बदल न करता सदर माहितीच गुणानुक्रमे निकालामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्राप्त त्रुटींची तपासणी करण्यात येत असून पदभरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांची अंतिम निवड ही त्यांचे कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रावेर (जि.जळगाव) येथील दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत आकारलेल्या मुद्रांक शुल्कात तफावत आढळून आल्याबाबत

**(२८) * १८१९८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (ता.रावेर, जि.जळगाव) येथील दुय्यम निबंधक कार्यालयाकडून गट क्रमांक १७८० क्षेत्र १ हेक्टर ४५ आर संदर्भातच्या मुल्यांकन दाखल्यासाठी दिनांक ३० जून, २०२२ रोजी केलेल्या अर्ज क्र.६७५/२०२२ च्या अनुषंगाने संगणकीय मॉडयूलमधून मिळकतीचे मुल्यांकन रुपये २,३८,०५,०००/- देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समान गट क्रमांक १७८० क्षेत्र १ हेक्टर ४५ आर संदर्भातच्या मुल्यांकन दाखल्यासाठी दिनांक १९ ऑगस्ट, २०२२ रोजी केलेल्या अर्ज क्र. ८२७/२०२२ च्या अनुषंगाने मॅन्युअल मुल्यांकन मिळकतीचे बाजारमूल्य रुपये १,६७,६७,०००/- नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समान गट क्रमांक १७८० क्षेत्र १ हेक्टर ४५ आर संदर्भात प्राप्त झालेल्या मुल्यांकन दाखल्यांमध्ये संगणकीय मुल्यांकन व मॅन्युअल मुल्यांकनामध्ये तफावत निदर्शनास येत असून उक्त तफावतीमागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुल्यांकन दाखल्यांमध्ये संगणकीय मुल्यांकन व मॅन्युअल मुल्यांकनामधील तफावतीच्या कारणांनुसार त्यात दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संगणकीय प्रणालीतील त्रृटीमुळे संगणकीय मूल्यांकन व मॅन्युअल मूल्यांकनामध्ये तफावत येत आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून संगणकीय प्रणालीतील त्रृटी दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे ते बेंगलोर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गाकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनींना बाजारभावाच्या दराने भरपाई मिळणेबाबत

**(२९) * १८५०० श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुणे ते बेंगलोर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गाकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनींना बाजारभावाच्या दहा पटीने किंवा दोन कोटी रुपये एकर दराने जमिनीची भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीने उपविभागीय अधिकारी, मिरज (जि.सांगली) यांना दिलेल्या निवेदनात केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे ते बेंगलोर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग सांगली जिल्ह्यातील अडतीस गावांमधून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावातील बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शासकीय सेवेत सामावून घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूसंपादन कायदा, २०१३ नुसार भूसंपादनाच्या संपूर्ण प्रक्रियेचे नियमन आणि नियंत्रण करुन जमीन मालकांना योग्य मोबदला देण्यासाठी, व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी तरतूद करणे आणि ज्यांची जमीन घेतल्यामुळे सर्वाधिक प्रभावित झालेल्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्यामुळे सदर कायद्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना बाजार भावाच्या दराने त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) भारतीय शेतकरी कामगार पक्षांतर्गत, पुणे-बेंगलोर ग्रीनफिल्ड हायवे बाधित शेतकरी संघर्ष समितीने दिनांक ०५/०१/२०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे अशा आशयाची मागणी उप विभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे.

(२) पुणे ते बेंगलोर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग सांगली जिल्ह्यातील मिरज उपविभागातील एकूण २६ गावे व विटा उपविभागातील १२ गावे अशा एकूण ३८ गावांमधून जात आहे.

(३) शेतकरी संघर्ष समितीने सुरुवातीपासूनच, बाधित शेतकऱ्यांच्या पाल्यांना रोजगार देण्याची मागणी केली आहे.

(४) व (५) सदर प्रकल्पाकरिता राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ नुसार भूसंपादन प्रक्रिया करण्यात येत आहे. तथापि, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम,२०१३ मधील कलम २६ ते ३० नुसार जमीनीचे मूल्यांकन करण्यात येत आहे. तसेच सदर उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार प्रत्येक टप्प्यावर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदी अन्वये सक्षम अधिकारी (CALA) तथा भूसंपादन अधिकारी म्हणून उप विभागीय अधिकारी, मिरज व उप विभागीय अधिकारी, खानापूर-विटा यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार जमिनींची नुकसान भरपाई आणि जमिनीचा मोबदला, पुनर्वसन व पुनर्वसाहत विषयक लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.